॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

www.veerbhuminews.com

**✻ सुविचार ✻**

विचार सकारात्मक असतील तर परिणामही सकारात्मकच असतो.

अहिल्यानगर | गुरुवार, दि. १० सप्टेंबर २०२६ | वर्ष ७ वे | अंक ७८ वा | पाने ४ | किंमत ३ रुपये | RNI No. MAHMAR / 2012 / 47715 | 9420802145

# यंदा साखर हंगाम १५ ऑक्टोबरपासून

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस । सह्याद्री अतिथिगृह येथे विविध कारखान्यांच्या संघटनांचे प्रतिनिधी

**मुंबई । वीरभूमी –** ऐन सणासुदीच्या काळात साखरेच्या वाढत्या दरामुळे सर्वसामान्यांचे बजेट कोलमडले असून महागाईची झळ सोसावी लागत आहे. अशातच साखरेच्या दरावर नियंत्रण ठेवण्यासाठी सरकार विविध स्तरांवर उपाययोजना करत आहे. साखरेचे दर अचानक वाढल्यामुळे ग्राहकांना मोठा फटका बसत आहे. दरम्यान, वाढत्या साखरेच्या दराच्या पार्श्वभूमीवर एक महत्त्वाची बातमी समोर आली आहे. राज्याचा साखर हंगाम यंदा १५ ऑक्टोबरपासून सुरू होणार आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या बैठकीत या संदर्भात निर्णय घेतल्याची माहिती आहे.

दरम्यान, सह्याद्री अतिथिगृह येथे विविध कारखान्यांच्या संघटनांचे प्रतिनिधी सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, माजी मंत्री दिलीप वळसे पाटील यांच्यासह विविध आमदारांच्या बैठकीत या संदर्भात निर्णय घेण्यात आल्याची माहिती आहे.

देशात साखरेचा तुटवडा निर्माण झाला होता. त्यामुळे किरकोळ बाजारात साखरेच्या दराने उसळी घेतली होती. ऑगस्टमध्ये साखरेचे दर ७० ते ७५ रुपये किलोवर गेल्याचे पहायला मिळाले होते. तर नोव्हेंबरपूर्वी गळीत हंगाम सुरू करणे शेतकरी आणि कारखान्यांच्या तोट्याचे असल्याची कारखानदारांनी भूमिका घेतली होती. अशातच आता या संदर्भात मुख्यमंत्र्यांनी मोठा निर्णय घेत राज्याचा साखर हंगाम यंदा १५ ऑक्टोबरपासून सुरू होणार असल्याची माहिती आहे.



साखरेच्या दरवाढीमुळे सर्वसामान्यांना सणावाराला महागाईचे चटके सहन करावे लागत आहेत. गणेशोत्सव तोंडावर आला असताना साखरेसह दूध, डाळींची दरवाढ झाली आहे. गणेशोत्सवानंतर नवरात्र, दसरा-दिवाळी असा सणांचा सिझन समोर आहे. त्यामुळे साखरेचे दर आटोक्यात ठेवण्यासाठी उसाचा गाळप हंगाम महिनाभर आधी सुरू करण्याचा निर्णय सरकार घेऊ शकते. मात्र याला शेतकरी आणि कारखानदारांनी विरोध दर्शवला आहे. रोजच्या स्वयंपाकापासून ते मिठाईपर्यंत, सर्वांत जास्त आवश्यक गोष्ट म्हणजे गोडी वाढवणारी साखर. मात्र, ऐन सणासुदीला साखर महाग झाल्यामुळे सर्वसामान्यांच्या पाकिटावर ताण येतोय. त्यातच 'सणांचा राजा' दिवाळी जवळ येत असताना सरकारला साखरटंचाईची भीती जाणवू लागली आहे. त्यामुळे यंदा उसाचा गाळप हंगाम लवकर सुरू करण्याचे सरकारच्या विचाराधीन आहे. केंद्र सरकारने देशात सर्वांत जास्त साखरेचे उत्पादन घेणा-या महाराष्ट्राला तशी सूचना केली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी मंत्री समितीची बैठक घेतली. या बैठकीत उसाचा गाळप हंगाम कधी सुरू करायचा याचा निर्णय घेतला. गेल्या हंगामात विविध कारणांनी साखरेचे उत्पादन घटल्यामुळे दर चढे राहिले. दिवाळीत साखरेने 'दिवाळं' काढू नये, यासाठी यंदा गाळप हंगाम अधिक लवकर सुरू केला आहे. दरवर्षी नोव्हेंबर महिन्यात गाळप हंगाम सुरू होतो. मात्र, यंदा १५ ऑक्टोबरपासून साखर कारखान्यांची यंत्रं सुरू व्हावीत, असा सरकारचा मानस आहे. मात्र, याला साखर कारखानदारांनी विरोध केला आहे.

# एमपीएससी पूर्वपरीक्षा पुढे ढकलली

## २५ ऑक्टोबरऐवजी आता ३ जानेवारीला होणार परीक्षा

**मुंबई । वीरभूमी –** स्पर्धा परीक्षेत होणारा गोंधळ, परीक्षेच्या आयोजनातून समोर येणारा ढिसाळ कारभार या सर्व प्रकारामुळे राज्यभरातील विद्यार्थी आंदोलन करत आहेत. गेल्या काही दिवसांत परीक्षेतील कथिक पेपरफुटीची प्रकरणे समोर आल्याने एमपीएससीच्या कारभारावर गंभीर प्रश्न उपस्थित केले जात आहेत. दरम्यान, एकीकडे विद्यार्थ्यांचे आंदोलन सुरू असतानाच एमपीएससीने आज परिपत्रक काढत गट क २०२६ ची संयुक्त पूर्व परीक्षा पुढे ढकलली आहे.

एमपीएससीने आज परिपत्रक जारी केले असून, त्यानुसार गट क २०२६ ची संयुक्त पूर्व परीक्षा पुढे ढकलली आहे. नियोजित वेळापत्रकानुसार ही परीक्षा २५ ऑक्टोबर रोजी होणार होती. परंतु ही परीक्षा तीन महिने पुढे ढकलण्यात आली आहे. नव्या परिपत्रकानुसार ही परीक्षा ३ जानेवारी २०२७ रोजी होणार आहे.

स्पर्धा परीक्षेची तयारी करणारे विद्यार्थी पुण्यात आक्रमक झाले. त्यांनी एकत्र येऊन एमपीएससीच्या कारभाराविरोधात आंदोलन केले. या आंदोलनात आमदार रोहित पवार यांनीदेखील सहभाग नोंदवला. त्यांनी विद्यमान एमपीएससी अध्यक्षांच्या कार्यपद्धतीवर आक्षेप घेतला. त्यांनी काहीही झाले तरी एमपीएससीच्या विद्यमान अध्यक्षांना हटवावे. त्याऐवजी आयएएस अधिकारी तुकाराम मुंढे यांच्यासारख्या तडफदार अधिका-याला नियुक्त करावे, अशी मागणी रोहित पवार यांनी केली. विरोधकांनी हा मुद्दा लावून धरल्याने सरकारला सावध पवित्रा घ्यावा लागत आहे.

भविष्यात कधीही पेपरफुटी होणार नाही, भरती प्रक्रियेत पारदर्शकता राहील, यासाठी योग्य पावले उचलली जातील, असे सरकारने सांगितले आहे. असे असतानाच आता एमपीएससीने गट क २०२६ ची संयुक्त पूर्व परीक्षा पुढे ढकलली. आता ही परीक्षा साधारण तीन महिन्यांनी होणार आहे.

राज्यसेवा मुख्य परीक्षा २०२५ च्या गुणांमधील प्रचंड तफावतीबाबत विद्यार्थ्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांनंतर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने उमेदवारांना गुणांच्या फेरपडताळणीची संधी उपलब्ध करून दिली आहे. इच्छुक उमेदवारांना आयोगाने निश्चित केलेल्या ऑनलाईन प्रक्रियेद्वारे १० सप्टेंबर २०२६ पर्यंत अर्ज सादर करता येणार आहेत, असे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने स्पष्ट केले.

# अरविंद केजरीवाल यांची पुन्हा 'आप' च्या राष्ट्रीय संयोजकपदी निवड

**नवी दिल्ली । वीरभूमी –** आम आदमी पक्षाकडून (आप) अरविंद केजरीवाल यांची पुन्हा एकदा पक्षाच्या राष्ट्रीय संयोजकपदी एकमताने निवड करण्यात आली आहे. बुधवारी पक्षाच्या राष्ट्रीय परिषदेच्या बैठकीमध्ये हा निर्णय घेण्यात आलेला आहे. यावेळी बैठकील ३३० सदस्यांची उपस्थिती होती.

यावेळी पक्षाकडून २३ सदस्यीय नवीन राष्ट्रीय कार्यकारिणीचीही स्थापना करण्यात आलेली आहे. यामध्ये पंकज गुप्ता यांची राष्ट्रीय सचिवपदी नियुक्ती करण्यात आली आहे. एन. डी. गुप्ता यांच्या राष्ट्रीय खजिनदारपदाची जबाबदारी कायम ठेवण्यात आली आहे. बैठकीमध्ये पक्षाने संघटनात्मक रचना मजबूत करण्याच्या दृष्टीने विविध निर्णय घेण्यात आले आहेत.

'आप'चे राष्ट्रीय माध्यम प्रभारी अनुराग धांडा यांनी केजरीवल यांच्या पुनर्निवडीबद्दल त्यांचे अभिनंदन केले.



तसेच केजरीवाल यांच्या नेतृत्वाखाली पक्ष आगामी प्रत्येक राजकीय आव्हानाचा सामना करण्यासाठी सज्ज असल्याचे देखील सोशल मीडिया पोस्टच्या माध्यमातून म्हटले आहे. गेल्या काही वर्षांमध्ये 'आप'ला निवडणुकांमध्ये पराभवाचा सामना करावा लागला होता. असे असले तरी, पक्षाच्या नेतृत्वाची धुरा ही केजरीवाल यांच्याकडेच कायम ठेवण्यात आली आहे. केजरीवाल यांची राष्ट्रीय संयोजकपदी बिनविरोध निवड झाल्याने पक्षातील त्यांच्या नेतृत्वाला मान्यता मिळाल्याचे मानले जात आहे.

## वीरभूमी फोडणी

अरुण महादेव वाळुंज । अहिल्यानगर, मो. ९६२३८६८३७२

### झगमगाट

अंधार नकोच कुणाला
हवाय फक्त झगमगाट
सेल्फी काढण्याच्या नादात
राहून गेले जेवणाचे ताट
असण्यापेक्षा दिसण्याला
किती आले ना महत्व?
ज्याचा माल, त्याचा ताल
चुलीत गेली तत्व

## SPOT NEWS

### पुण्यात स्वाईन फ्लूचा वेग वाढला

**पुणे –** शहरात डेंग्यू, चिकनगुनियाच्या वाढत्या प्रादुर्भावानंतर आता स्वाईन फ्लूच्या रुग्णसंख्येत वाढ होत आहे. गेल्या सहा महिन्यांच्या तुलनेत सुमारे ११ पटीने रुग्णसंख्या वाढली आहे. परिणामी रुग्णालयातील खाटांचे (बेड) नियोजन कोलमडले आहे. दरम्यान, गणेशोत्सव, नवरात्र आणि इतर सण-उत्सवांच्या काळात नागरिकांनी गर्दीमध्ये काळजी घेण्याचे आवाहन आरोग्य विभागाकडून करण्यात आले आहे. महापालिकेच्या आकडेवारीनुसार, जून महिन्यात शहरात स्वाईन फ्लूचे १३ रुग्ण होते. जुलैमध्ये ही रुग्णसंख्या वाढून ३५ झाली. ऑगस्टमध्ये रुग्णसंख्येत थेट ११ पटीने वाढ होऊन ४०७ वर गेली तर सप्टेंबर महिन्याच्या सुरुवातीलाच ही रुग्णसंख्या ५४६ पर्यंत वाढली आहे. रुग्णसंख्येत अचानक होणारी वाढ ही चिंताजनक असून, याचा परिणाम रुग्णालयांच्या व्यवस्थापनावर झाला आहे.

### परीक्षा केंद्रांवरील छेडछाड आता महागात पडणार!

**मुंबई –** कर्मचारी निवड आयोगाने संगणक आधारित भरती परीक्षेत सहभागी होणा-या उमेदवारांसाठी आणि परीक्षा केंद्रांवर तैनात असलेल्या कर्मचा-यांसाठी एक महत्त्वाची अॅडव्हायजरी जारी केली आहे. आयोगाने परीक्षा केंद्रावरील कॉम्प्युटर सिस्टीमबाबत काही हालचालींवर बंदी घातली आहे. आता परीक्षेदरम्यान उमेदवार किंवा परीक्षा कर्मचारी स्वत:हून कॉम्प्युटर रिस्टार्ट, शटडाउन किंवा सिस्टीम बदलू शकणार नाहीत. या कामांसाठी अधिकृत परीक्षा स्टाफची परवानगी आणि ठरवून दिलेली प्रक्रिया पाळणे बंधनकारक राहणार आहेत.

# श्री तुळजाभवानीच्या सोन्यावरून पुन्हा वाद

## मंदिर प्रशासनाने सोने-चांदी वितळवण्यासाठी राज्याच्या विधी व न्याय विभागाकडे नव्याने मागितली परवानगी

**धाराशिव । वीरभूमी –** श्री तुळजाभवानी देवीच्या चरणी भक्तांनी अर्पण केलेले २४७ किलो सोने आणि ३,२९८ किलो चांदी वितळवण्याच्या प्रस्तावावरून वाद पुन्हा पेटला आहे. मंदिर प्रशासनाने सोने-चांदी वितळवण्यासाठी राज्याच्या विधी व न्याय विभागाकडे नव्याने परवानगी मागितली आहे.

या प्रकरणी समितीच्या वतीने अधिवक्ता (पू.) सुरेश कुलकर्णी आणि अधिवक्ता उमेश भडगावकर यांनी धाराशिवचे जिल्हाधिकारी, राज्याचे मुख्य सचिव, गृह सचिव आणि विधी व न्याय विभागाच्या सचिवांना न्यायालयाच्या अवमानाची नोटीस बजावली आहे. ठराव मागे न घेतल्यास संबंधित अधिका-यांविरोधात त्यांच्या वैयक्तिक क्षमतेत फौजदारी अवमान याचिका दाखल करण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

मात्र, मंदिर प्रशासनाने हा आरोप फेटाळला आहे. गुन्ह्यातील सोन्याला हात लावला जाणार नसून, त्याव्यतिरिक्त असलेले सोने-चांदी वितळवण्यासाठीच शासनाची परवानगी मागण्यात आली आहे, अशी भूमिका तुळजाभवानी देवस्थानच्या व्यवस्थापक माया माने यांनी स्पष्ट केली.

### उच्च न्यायालयाच्या आदेशाचा समितीचा दाखला

हिंदू जनजागृती समितीच्या म्हणण्यानुसार, १ जानेवारी २०१० ते १० जून २०२३ या कालावधीत अर्पण झालेले सोने वितळवण्याची परवानगी मिळावी, यासाठी मंदिर संस्थानाने उच्च न्यायालयात अर्ज केला होता. मात्र, २३ जानेवारी



२०२५ रोजी न्यायालयाने हा अर्ज फेटाळला. संबंधित प्रकरण सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असल्याने अंतरिम आदेशात बदल करणे योग्य ठरणार नाही, अशी न्यायालयाची भूमिका असल्याचे समितीने म्हटले आहे. त्यामुळे त्याच विषयावर नव्याने ठराव करून शासनाकडे परवानगी मागणे कायदेशीरदृष्ट्या चुकीचे असल्याचा समितीचा दावा आहे. प्रशासन मात्र सध्याचा प्रस्ताव न्यायालयीन प्रकरणातील सोन्याशी संबंधित नसल्याचे सांगत आहे.

### सोन्याच्या मुकुटाच्या सत्यतेचा मुद्दा

समितीने ८ डिसेंबर २०२३ रोजीच्या उच्च न्यायालयाच्या आदेशाचाही दाखला दिला आहे. मंदिरात भक्ताने अर्पण केलेला सोन्याचा मुकुट खरा नसल्याचे तपासणीत आढळल्याचा उल्लेख त्या आदेशात असल्याचे समितीचे म्हणणे आहे. तसेच मंदिरातील ७१ प्राचीन नाणी, सोन्याचा मुकुट आणि मंगळसूत्र गायब असल्याचा दावा समितीने केला आहे. त्यामुळे उर्वरित सोने वितळवल्यास जुन्या दागिन्यांची सत्यता तपासण्यासाठी आवश्यक पुरावे नष्ट होण्याची शक्यता असल्याचे समितीने म्हटले आहे. मंदिरातील चोरी किंवा भ्रष्टाचाराबाबत समितीने केलेले हे आरोप आहेत. त्यांची स्वतंत्र अधिकृत पुष्टी या उपलब्ध माहितीत झालेली नाही.

### प्रशासनाचे म्हणणे काय?

तुळजाभवानी देवस्थानच्या व्यवस्थापक माया माने यांनी समितीचा आरोप स्पष्टपणे फेटाळला. त्यांच्या म्हणण्यानुसार, गुन्ह्यात दाखल असलेल्या सोन्याचे प्रकरण न्यायालयात सुरू आहे आणि त्या सोन्याला कुणीही हात लावणार नाही. 'गुन्ह्यातील सोन्याचा विषय पूर्णपणे वेगळा आहे. त्याव्यतिरिक्त असलेले सोने-चांदी वितळवण्यासाठी शासनाकडे परवानगी मागितली आहे. त्यामुळे न्यायालयाचा अवमान होण्याचा प्रश्नच नाही,' असे माने यांनी स्पष्ट केले.

### सर्वोच्च न्यायालयाच्या स्थगितीवरूनही मतभेद

समितीने आपल्या नोटिशीत सर्वोच्च न्यायालयातील प्रकरणाचाही उल्लेख केला आहे. प्रशासनाकडून सर्वोच्च न्यायालयाच्या स्थगितीचा आधार घेतला जात असल्याचा समितीचा दावा आहे. मात्र, संबंधित स्थगिती ८.५० कोटी रुपयांच्या कथित अपहाराच्या प्रकरणातील १६ दोषींवर गुन्हे दाखल करण्याच्या मुद्यापुरती मर्यादित असल्याचे समितीने म्हटले आहे. या स्थगितीचा सोने वितळवण्याच्या परवानगीशी संबंध नसून, त्यावर उच्च न्यायालयाचा आधीचा आदेश कायम असल्याचा समितीचा दावा आहे.

## SPOT NEWS

### शिक्षिका हेलन पाटोळे यांना राज्यस्तरीय ‘उडाण’ पुरस्कार

**अहिल्यानगर । वीरभूमी –**

समाजातील वंचित, गरजू आणि दुर्बल घटकांसाठी सातत्याने कार्य करणाऱ्या शिक्षिका हेलन लेक्स पाटोळे यांना त्यांच्या उल्लेखनीय सामाजिक कार्याबद्दल राज्यस्तरीय ‘उडाण’ पुरस्काराने गौरविण्यात आले. महिला सक्षमीकरण, गरजू मुलींच्या विवाहासाठी मदत, तंटामुक्ती तसेच वंचित घटकांतील मुलींना शैक्षणिक मदत अशा विविध क्षेत्रांत त्यांनी केलेल्या कार्याची दखल घेत हा सन्मान प्रदान करण्यात आला. उडाण फाउंडेशन संलग्न जय असोसिएशन ऑफ एनजीओ, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने टिळक रोड येथील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालयात देशभक्तीपर गीते, नृत्य आणि ‘महाराष्ट्राची लोकधारा’ या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याच कार्यक्रमात आंतरराष्ट्रीय कुस्तीपटू डॉ. शबनम शेख यांच्या हस्ते हेलन पाटोळे यांना राज्यस्तरीय ‘उडाण’ पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी पुणे येथील ज्येष्ठ विधीज्ञ अ‍ॅड. प्रशांत साळुंके, अवतार मेहेरबाबा ट्रस्टचे संचालक मेहरनाथ कलचुरी, विशेष सरकारी वकील अ‍ॅड. सुरेश लगड, जय असोसिएशन ऑफ एनजीओचे राज्याध्यक्ष अ‍ॅड. महेश शिंदे, उडाण फाउंडेशनच्या अध्यक्षा आरती शिंदे, शासनाचा राज्य आदर्श युवती पुरस्कार प्राप्त जयश्री शिंदे, अ‍ॅड. अनिता दिघे, अ‍ॅड. दिनेश शिंदे आदी उपस्थित होते. हेलन पाटोळे यांनी शिक्षिका म्हणून आपल्या जबाबदारीसोबतच सामाजिक कार्याचीही बांधिलकी जपली आहे. विशेषतः महिला आणि वंचित घटकांतील मुलींच्या प्रश्नांकडे त्यांनी संवेदनशीलतेने पाहत विविध प्रकारे मदतीचा हात पुढे केला आहे. समाजातील गरजू व्यक्तींना आधार देण्याबरोबरच महिलांना सक्षम करण्यासाठी त्या सातत्याने प्रयत्नशील आहेत.

### अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांच्या भरतीला मान्यता देण्याची मागणी

**अहिल्यानगर । वीरभूमी –**

नाशिक डायोसिस कौन्सिल पी.टी.आर. डी–२ (रिलिजिअस ट्रस्ट) या अल्पसंख्याक संस्थेअंतर्गत अहिल्यानगर व छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात विविध शैक्षणिक संस्था कार्यरत आहेत. या संस्थांमधील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच शिपाई पदांच्या रिक्त जागा भरण्यासाठी आवश्यक मान्यता मिळावी, अशी मागणी नाशिक डायोसिस कौन्सिलने महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाकडे केली आहे. या संदर्भात कौन्सिलचे सचिव अँड. विनायक पंडित यांनी महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष आमदार प्यारे झिया खान यांना निवेदन सादर केले यावेळी राजु देठे आदीसह पदाधिकारी उपस्थित होते. निवेदनात नाशिक डायोसिस कौन्सिल ही अल्पसंख्याक धार्मिक संस्था असून तिच्या माध्यमातून अहिल्यानगर व छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यांत शैक्षणिक व वैद्यकीय सेवा सुरू असल्याचे नमूद करण्यात आले आहे. अहिल्यानगर जिल्ह्यात सेंट मोनिका अध्यापिका विद्यालय (डी.एड.) सावेडी, सेंट सेव्हिअर्स माध्यमिक स्कूल व ज्युनिअर कॉलेज तारकपूर, प्रगत कला महाविद्यालय (आर्ट कॉलेज) तारकपूर, सेंट सेबॅस्टियन प्राथमिक इंग्लिश स्कूल तारकपूर आणि सेंट मोनिका प्रायमरी स्कूल तारकपूर या संस्था कार्यरत आहेत. तसेच छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात क्राइस्टचर्च माध्यमिक स्कूल कार्यरत असल्याचे पत्रात नमूद आहे. महाराष्ट्र राज्य खाजगी शाळा अधिनियमातील तरतुदींनुसार अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांना त्यांच्या संस्थांमधील रिक्त पदांवर कर्मचारी नियुक्त करण्याचे अधिकार असल्याचे कौन्सिलने निवेदनात म्हटले आहे. तसेच अल्पसंख्याक संस्थांमधील शिक्षक पदांसाठी ढएढ परीक्षा अनिवार्य नसल्याबाबत विविध न्यायालयीन निर्णयांचा दाखला देण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर संबंधित शिक्षण आयुक्त, शिक्षण संचालक (माध्यमिक) व शिक्षण संचालक (प्राथमिक) यांना आवश्यक आदेश देऊन संस्थेतील रिक्त शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व शिपाई पदे भरण्यासाठी मान्यता मिळावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

# शेवगावात भव्य दहीहंडी उत्सवाचा जल्लोष

**वडार समाज गोविंदा पथकाची बाजी । १ लाख ११ हजार १११ रुपयांचे प्रथम पारितोषिक**

**शेवगाव । वीरभूमी –**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सहकार्याने शेवगावचा चेहरामोहरा बदलणार असून, पैठण–संभाजीनगरप्रमाणे शेवगाव तालुकाही शिवसेनामय करणार, असा विश्वास खासदार संदीपान भुमरे यांनी व्यक्त केला.

शहरातील खंडोबा मैदानावर नगराध्यक्ष भव्य दहीहंडी उत्सव सोहळा जल्लोषात पार पडला. यावेळी खासदार भुमरे बोलत होते. या दहीहंडी सोहळ्यात तब्बल आठ गोविंदा पथकांनी सहभाग घेतला. चुरशीच्या लढतीत वडार समाज गोविंदा पथकाने बाजी मारत प्रथम क्रमांक पटकावला. विजेत्या पथकाला १ लाख ११ हजार १११ रुपये रोख पारितोषिक व मानाची ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले. सहभागी पथकांपैकी पाच पथकांना प्रत्येकी ११ हजार रुपयांचे उत्तेजनार्थ पारितोषिक व ट्रॉफी देण्यात आली.

यावेळी ‘धप्पा’ चित्रपटातील कलाकारांचा सन्मान करून आगामी चित्रपटाच्या पोस्टरचे अनावरण करण्यात आले. नृत्यांगना स्नेहा पिंपरीकर यांचाही विशेष सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमास शिवसेना नेते अरुण मुंढे, नगराध्यक्षा माया मुंढे, ज्येष्ठ नेते अरुण लांडे, पैठण नगरपरिषदेचे नगराध्यक्ष भूषण कावसानकर, दूध महासंघाचे चेअरमन नंदकुमार काळे, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष अमोल सागडे, नंदकुमार पठाडे, नाथ मंदिर विश्वस्त दादा बारे, गहिनीनाथ शिरसाठ, अ‍ॅड. संजय सानप, प्रेमसुख जाजू, राजेंद्र तरटे, नंदकुमार मुंढे, दिगंबर काथवटे, अंकुश कुसळकर, एकनाथ कुसळकर, अ‍ॅड. शाम कनंगरे, उदय गांगुर्डे यांच्यासह दहीहंडी उत्सव समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.

अरुण मुंढे मित्र मंडळ, वंदे मातरम् ग्रुप व दहीहंडी उत्सव समिती, शेवगाव शहर यांच्या वतीने उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. सूत्रसंचालन प्रा. दीपक कुसळकर यांनी केले.



शेवगाव : शहरातील खंडोबा मैदान येथे नगराध्यक्ष भव्य दहीहंडी उत्सवात चुरशीच्या लढतीत दहीहंडी फोडताना वडार समाज गोविंदा पथक व उपस्थित जनसमुदाय. (छाया : अमोल कराळे)

### आदिवासी शेतकऱ्याची जमीन अतिक्रमण करून लावलेली पीक नोंद रद्द करण्याची मागणी

**अहिल्यानगर । वीरभूमी–**

आदिवासी शेतकरी खंडू बहिरू कोळी राहता पुणेवाडी ता पारनेर जिल्हा अहिल्यानगर येथे रहिवासी असून ते भटक्या विमुक्त आदिवासी समाजाचे असल्याने त्यांना महाराष्ट्र शासनाने सन १९३० पासून आपला प्रपंच चालवण्यासाठी महाराष्ट्र शासन जमीन गट नंबर २४ ९७ ही दिली तेव्हापासून ते जमीन कसून आपला प्रपंच चालवत होतो पण जमीन कोरडवाहू असल्याने व पावसावर शेती अवलंबून असल्याने पाऊस न झाल्यास पीक धान्य येत नाही व त्यामुळे उपासमारीची वेळ येत होती त्यामुळे खंडू यांना दोन मुले असल्याने या मोलमजुरी करून आपला प्रपंच चालवत होते परंतु मॉल मजुरी मिळत नाही व मुलांचे शिक्षण होत नाही परिस्थिती अत्यंत बिकट असल्याने त्यांनी आपली उपजीविका भागवण्यासाठी पुणेवाडी गाव सोडून बाहेरगावी सातारा या ठिकाणी स्थलांतर केले तेथे पण पती–पत्नीने मोलमजुरी करून आपल्या मुलांना शिक्षण दिले त्यानंतर ११ जानेवारी १९७० रोजी मृत्यू झाला त्यानंतर पती सोनाबाई खंडू कोळी यांचा ३ डिसेंबर २००१ रोजी मृत्यू झाला या दोघांच्या मृत्यूमुळे दुःखातून सावरण्यासाठी मुलगा शिवाजी खंडू कोळी व मुलगी हौसाबाई सोनबा मोरे यांना वेळ मिळाला नाही त्यानंतर आपल्या वडिलांना मिळालेल्या शासकीय जमीन गट नंबर २४ ९७ पुणेवाडी येथील वारस नोंद लावण्यासाठी तहसीलदार पारनेर येथे गेले असता त्यांना समजले की या शासकीय जमिनीवर गावातील ठकाराम बाबुराव ठाणगे व शरद खांडगे राहता कुंभारवाडी ता पारनेर जिल्हा अहिल्यानगर यांनी आदिवासी कोळी समाजाच्या जमिनीवर पीक पाण्याची नोंद लावली तेव्हा त्यांना विचारणा केली असता ते म्हणाले की आदिवासी लोक आमचे काहीच करू शकत नाही अन्यथा आपण जीव मारून टाकू अशा प्रकारची जीवा मारण्याची धमकी दिली आहे आमची आदिवासी जमीन असताना तहसीलदार सर्कल तलाठी यांनी पीक पाण्याचे नोंद कोणत्या प्रकारे लावण्यात आली याची चौकशी करून त्यांचे नाव रद्द करण्यात यावे व पुढील आदिवासी शिवाजी खंडू कोळी व मुलगी हौसाबाई सोनवा मोरे यांचे नावाची वारस नोंद करण्यात यावी या मागणीचे निवेदन निवासी उपजिल्हाधिकारी यांना देण्यात आले तसेच स्कीम उतारा मृत्यूचे प्रमाणपत्र सन २०१५ चा सातबारा उतारा सन २०२६ चा सातबारा उतारा देखील पुरावा म्हणून देण्यात आलेला आहे.

### दोन वर्षांपासून भाग्यलक्ष्मीच्या ठेवीदारांचा पैशांसाठी संघर्ष; आर्थिक गुन्हे शाखेकडे तपास वर्ग करण्याची मागणी

**अहिल्यानगर । वीरभूमी–**

भाग्यलक्ष्मी मल्टिस्टेट क्रेडिट को–ऑपरेटिव्ह सोसायटी लि.च्या संचालक मंडळ व संबंधित व्यक्तींविरुद्ध दाखल असलेले आर्थिक गैरव्यवहार व ठेवीदारांच्या पैशांशी संबंधित सर्व गुन्हे तातडीने आर्थिक गुन्हे अन्वेषण शाखेकडे अहिल्यानगर वर्ग करावेत, अशी मागणी जन आधार सामाजिक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्रकाश पोटे यांच्यासह भाग्यलक्ष्मी मल्टिस्टेटच्या ठेवीदारांनी केली आहे. याबाबत पोलीस उपअधीक्षक वैभव कलूबर्मे यांना निवेदन देण्यात आले.

भाग्यलक्ष्मी मल्टिस्टेट क्रेडिट को–ऑपरेटिव्ह सोसायटीच्या संचालक मंडळ व संबंधित व्यक्तींविरुद्ध आर्थिक गैरव्यवहार आणि ठेवीदारांच्या पैशांशी संबंधित गुन्हे दाखल आहेत. यातील अनेक गुन्हे एमआयडीसी पोलीस ठाण्यात १० सप्टेंबर २०२४ रोजी दाखल करण्यात आले आहे. मात्र, गुन्हा दाखल होऊन दीर्घ कालावधी उलटूनही ठेवीदारांना त्यांच्या कष्टाच्या पैशांबाबत न्याय मिळालेला नसल्याचा आरोप निवेदनातून करण्यात आला आहे.

सदर प्रकरणे आर्थिक स्वरूपाची असल्याने त्यांचा तांत्रिक व सखोल तपास होणे आवश्यक आहे. त्यामुळे सर्व संबंधित गुन्हे एकत्रित करून आर्थिक गुन्हे अन्वेषण शाखेकडे वर्ग करावेत, अशी मागणी ठेवीदारांनी केली आहे.

आर्थिक गैरव्यवहारातून मिळविल्याचे तपासात निष्पन्न होणारी स्थावर व जंगम मालमत्ता शोधून चझखऊ कायद्यानुसार जप्तीची कार्यवाही सुरू करण्यासाठी तातडीने प्रस्ताव सादर करावा, तसेच संस्थेच्या आर्थिक व्यवहारांचे फॉरेन्सिक ऑडिट करून ठेवीदारांच्या पैशांचा वापर कुठे व कशाप्रकारे झाला, याचा तपास करावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

याशिवाय संस्थेचे संचालक, पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी, एजंट, ब्रोकर तसेच आर्थिक गैरव्यवहारात सहभागी असलेल्या व्यक्तींची भूमिका तपासावी. आरोपींच्या बँक खात्यांमधील व्यवहार, आर्थिक उलाढाल तसेच स्थावर–जंगम मालमत्तेची चौकशी करावी. आरोपींनी मालमत्ता इतरांच्या नावावर हस्तांतरित केली आहे का, याचाही तपास करून तसे आढळल्यास कायद्यानुसार कारवाई करावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

दोन वर्षांपासून ठेवीदार आपल्या हक्काच्या पैशांसाठी संघर्ष करीत असून तपास संथ गतीने सुरू असल्याने ठेवीदारांमध्ये तीव्र असंतोष आहे. त्यामुळे पोलीस प्रशासनाने या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन आर्थिक गुन्हे शाखेकडे तपास AOW कडे वर्ग करावा, फॉरेन्सिक ऑडिटसह संपूर्ण तपास करून दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करावी आणि ठेवीदारांचे कष्टाचे पैसे परत मिळवून देण्यासाठी प्रभावी पावले उचलावीत, अशी मागणी करण्यात आली.

यावेळी जन आधार सामाजिक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्रकाश पोटे यांच्यासह भाग्यलक्ष्मी मल्टिस्टेट क्रेडिट को–ऑपरेटिव्ह सोसायटी लि.चे अनेक ठेवीदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बसच्या गर्दीत मंगळसूत्र लंपास करणाऱ्या महिला जेरबंद

**टाकळी ढोकेश्वर बसस्थानकावरील चोरीचा पर्दाफाश । दोन महिला अटकेत, चारचाकी जप्त**

**पारनेर । वीरभूमी–**

बसमध्ये चढताना होणाऱ्या गर्दीचा फायदा घेत वृद्ध महिलेच्या गळ्यातील अडीच तोळे वजनाचे मंगळसूत्र लंपास करणाऱ्या महिला चोरट्यांच्या टोळीचा पारनेर पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. या प्रकरणी दोन महिला आरोपींना अटक करण्यात आली असून, चोरीसाठी वापरण्यात आलेली सुमारे एक लाख रुपये किमतीची सिल्व्हर रंगाची चारचाकी गाडी पोलिसांनी जप्त केली आहे. चौकशीदरम्यान आरोपींनी घारगाव व कोतवाली पोलिस ठाण्याच्या हद्दीतील आणखी दोन गुन्ह्यांची कबुली दिल्याची माहिती पोलिसांनी दिली.

सीताबाई मंजाबा खैरे (वय ७०) यांनी याबाबत पारनेर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. ३१ ऑगस्ट रोजी दुपारी दीडच्या सुमारास टाकळी ढोकेश्वर बसस्थानक येथे पाथर्डी–विठ्ठलवाडी बसमध्ये चढत असताना दोन ते तीन महिलांनी गर्दीचा फायदा घेत त्यांच्या गळ्यातील अडीच तोळे वजनाचे मंगळसूत्र चोरून नेले. याप्रकरणी ४ सप्टेंबर रोजी पारनेर पोलिस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ६९०/२०२६, भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

गुन्हा दाखल होताच सहाय्यक पोलिस निरीक्षक सोमनाथ दिवटे यांनी गुन्हे शाखेचे पथक आरोपींच्या शोधासाठी रवाना केले. गोपनीय बातमीदारामार्फत मिळालेल्या माहितीच्या आधारे तपास केला असता लीलाबाई भोलेनाथ खंदारे, शोभा सुरेश खंदारे आणि शोभा प्रताप खंदारे (सर्व रा. सलाबतपूर, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर) यांचा गुन्ह्यात सहभाग असल्याचे समोर आले.

याप्रकरणी आरोपी क्रमांक एक व दोन यांना अटक करण्यात आली आहे. त्यांच्या ताब्यातून गुन्ह्यात वापरलेली चारचाकी गाडी जप्त करण्यात आली असून, चोरीस गेलेले मंगळसूत्र जप्त करण्याची कारवाई सुरू आहे. न्यायालयाने आरोपी महिलांना दोन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे.

पोलिस कोठडीदरम्यान आरोपींनी घारगाव पोलिस ठाण्यातील गुन्हा क्रमांक ३४७/२०२६ तसेच कोतवाली पोलिस ठाण्यातील गुन्हा क्रमांक ८४७/२०२६, भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) अन्वये दाखल असलेल्या गुन्ह्यांची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले.

ही कारवाई पोलिस अधीक्षक मुमक्का सुदर्शन, उपविभागीय पोलिस अधिकारी शिरीष वमने आणि सहाय्यक पोलिस निरीक्षक सोमनाथ दिवटे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस कॉन्स्टेबल अमोल धामणे, कल्याण लगड, मनीषा कडूस, गणेश डोंगरे, सारंग वाघ, सतीश शिंदे तसेच दक्षिण विभाग मोबाईल सेलचे पोलिस कॉन्स्टेबल राहुल गुंड व अरुण सांगळे यांनी केली. पुढील तपास सहाय्यक फौजदार पोपट रोकडे करीत आहेत.



## SPOT NEWS

## राष्ट्रीय पुरस्कार मिळाल्याबद्दल संध्या गायकवाड यांचा सन्मान

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड यांना राष्ट्रीय शिक्षक योजना एवं प्रशासन संस्थान यांच्या वतीने राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आल्याबद्दल महाराष्ट्र राज्य वाहतूक सुरक्षा दल व नागरी संरक्षण संघटना, अहिल्यानगर–नाशिक विभाग यांच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला. शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करताना विविध उपक्रमांना चालना देत त्यांनी बजावलेल्या योगदानाची राष्ट्रीय पातळीवर दखल घेतली गेल्याने अहिल्यानगरच्या शैक्षणिक क्षेत्रातही या पुरस्काराचे स्वागत होत आहे. या वेळी RSP नाशिक विभागीय उपाध्यक्ष सिकंदर शेख आणि जिल्हा समादेशक प्रकाश मिंड यांच्या हस्ते शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी जिल्हा माध्यमिक वेतन पथकाचे अधीक्षक रामदास म्हस्के, जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष सुनील पंडित, विस्तार अधिकारी भिवसेन पवार आदी उपस्थित होते. यावेळी बोलताना सिकंदर शेख म्हणाले, अहिल्यानगर जिल्ह्यातील शिक्षणाधिकारी म्हणून संध्या गायकवाड यांनी शैक्षणिक क्षेत्रात केलेले योगदान निश्चितच उल्लेखनीय आहे.

# पाथर्डी-शेवगावमध्ये दुष्काळ जाहीर करा

**आ. मोनिका राजळे । अत्यल्प पावसामुळे पाणी, चारा व पिकांचे संकट; पंचनामे करून तातडीने मदत देण्याची मागणी**

**● पाथर्डी । वीरभूमी–**

**पाथर्डी–शेवगाव तालुक्यात अत्यल्प पावसामुळे पिण्याचे पाणी, चारा आणि पिकांचे गंभीर संकट निर्माण झाले असून शेतकरी हवालदिल झाला आहे. या पार्श्वभूमीवर आमदार मोनिका राजळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन पाथर्डी–शेवगाव तालुक्यात दुष्काळ जाहीर करून तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली.**



शेवगाव–पाथर्डी विधानसभा मतदारसंघात चालू वर्षी अत्यल्प पाऊस झाला. शेतकऱ्यांनी पेरण्या केल्यानंतर पाऊस न झाल्याने पिके वाया गेली आहेत. फळबागांसह विविध पिके पाण्याअभावी जळून चालली असून जनावरांच्या चाऱ्याचाही गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

मे २०२६ पासून मतदारसंघातील अनेक गावांना टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे. सध्या ५३ गावांतील २८१ वाड्या–वस्त्यांना ६५ टँकरद्वारे १२१ खेपा सुरू आहेत. आगामी काळात समाधानकारक पाऊस न झाल्यास पाणीटंचाईची तीव्रता आणखी वाढण्याची शक्यता आहे.

पावसाअभावी जळालेल्या पिकांचे तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना मदत द्यावी, तसेच जनावरांसाठी चारा छावण्या सुरू कराव्यात किंवा चारा व पाण्यासाठी शेतकऱ्यांना थेट अनुदान द्यावे, अशी मागणीही आ. राजळे यांनी केली.

मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट घेऊन आ. राजळे यांनी मतदारसंघातील दुष्काळी परिस्थितीची सविस्तर माहिती देत निवेदन सादर केले. पाथर्डी–शेवगाव तालुक्यात दुष्काळ जाहीर करून शेतकरी व पशुधनासाठी तातडीने आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी आग्रही मागणी त्यांनी केली.

## अल्पसंख्याक व दलित समाजावरील अन्यायाची चौकशी करा; आयोगाध्यक्षांकडे पीपल्स हेल्पलाईन व दलित पँथरचे निवेदन

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

अहिल्यानगर जिल्ह्यात अल्पसंख्याक तसेच अनुसूचित जाती आणि इतर वंचित घटकांवर होत असल्याचा आरोप असलेल्या अन्यायाच्या घटनांची चौकशी करून संबंधितांवर कारवाई करावी, अशी मागणी पीपल्स हेल्पलाईन आणि दलित पँथरच्या वतीने महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष प्यारे झिया खान यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली.

अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि सदस्य जिल्ह्याच्या आढावा दौऱ्यावर अहिल्यानगर शहरात आले असता शिष्टमंडळाने त्यांची भेट घेतली. यावेळी जिल्ह्यातील अल्पसंख्याक व दलित समाजाच्या विविध प्रश्नांकडे आयोगाचे लक्ष वेधत सविस्तर निवेदन देण्यात आले.

शिष्टमंडळात दलित पँथरचे अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष राजू जाधव, पीपल्स हेल्पलाईनचे प्रकाश थोरात, बौद्धाचार्य अण्णासाहेब गायकवाड, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक भाऊसाहेब ठोंबे, सामाजिक संस्थांचे संघाध्यक्ष गणेश कदम, बांधत जाधव, नंदू साळवे, चंद्रकांत जगधने आदींचा समावेश होता.

जिल्ह्यातील दलित व अल्पसंख्याक समाजातील नागरिक तसेच त्यांच्या प्रार्थनास्थळांशी संबंधित विविध प्रश्न उपस्थित करण्यात आले. काही ठिकाणी धार्मिक स्थळे आणि नागरिकांवर अन्याय होत असल्याचा आरोप करून या प्रकरणांची निष्पक्ष चौकशी करावी, संबंधित तक्रारींची वस्तुनिष्ठपणे पडताळणी करावी आणि दोषी आढळणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली.

शिष्टमंडळाने म्हटले आहे की, मागील काही दिवसांत जिल्ह्यात मुस्लिम, ख्रिश्चन आणि बौद्ध समाजाला लक्ष्य करणारी काही वक्तव्ये आणि घटना समोर येत असल्याचा त्यांचा आक्षेप आहे. अशा वक्तव्यांमुळे समाजामध्ये भीतीचे वातावरण निर्माण होऊन जातीय व धार्मिक तेढ वाढण्याची शक्यता असल्याने प्रशासनाने अशा घटनांकडे गांभीर्याने पाहण्याची आवश्यकता आहे.

मुस्लिम समाजाच्या मशिदी तसेच ख्रिश्चन समाजाच्या चर्च यांसारख्या प्रार्थनास्थळांबाबत करण्यात येणाऱ्या कारवाईचाही मुद्दा उपस्थित करण्यात आला आहे. काही धार्मिक स्थळांना बेकायदेशीर किंवा अतिक्रमण म्हणून नोटिसा देण्यात येत असल्याचा आरोप शिष्टमंडळाने केला. पोलीस, महसूल प्रशासन आणि इतर शासकीय यंत्रणांच्या माध्यमातून होणाऱ्या अशा कारवाईत सर्व धर्मीयांसाठी समान निकष लागू केले जावेत, अशी मागणी करण्यात आली.

सर्व धर्मांच्या बेकायदेशीर अतिक्रमणांबाबत कायद्याप्रमाणे समान कारवाई झाली पाहिजे; मात्र केवळ विशिष्ट धर्माच्या प्रार्थनास्थळांवरच कारवाई किंवा नोटिसा देण्यात येत असल्याचे आढळल्यास त्याची चौकशी होणे आवश्यक आहे, अशी भूमिका शिष्टमंडळाने मांडली.

सर्वोच्च न्यायालयाच्या धार्मिक स्थळे आणि अतिक्रमणासंदर्भातील निर्देशांचा प्रशासनाकडून योग्य व समान पद्धतीने अर्थ लावला जावा. कोणत्याही समाजाला लक्ष्य करण्यासाठी या निर्देशांचा वापर होऊ नये, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली.

मुस्लिम समाजातील नागरिकांबाबत सोशल मीडियासह विविध माध्यमांतून अपमानास्पद अथवा देशद्रोही ठरविणारी वक्तव्ये केली जात असल्याचा आरोपही शिष्टमंडळाने केला. एखाद्या व्यक्तीच्या कृतीवरून संपूर्ण समाजाला दोषी ठरविणे योग्य नसून, अशा प्रकारच्या वक्तव्यांमुळे समाजामध्ये भीती आणि अविश्वासाचे वातावरण निर्माण होऊ शकते. त्यामुळे सोशल मीडियावर जातीय किंवा धार्मिक तेढ निर्माण करणाऱ्या वक्तव्यांचीही प्रशासनाने दखल घ्यावी, अशी मागणी करण्यात आली.

ख्रिश्चन समाजाच्या धार्मिक कार्यक्रमांकडे आणि प्रार्थनास्थळांकडे धर्मांतराच्या संशयातून पाहिले जात असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. काही ठिकाणी धर्मांतराचे आरोप करून गुन्हे दाखल केले जात असल्याचे सांगत, अशा प्रकरणांची तथ्यांच्या आधारे चौकशी करावी आणि केवळ धार्मिक ओळखीच्या आधारावर कोणालाही त्रास होऊ नये, अशी मागणी करण्यात आली.

तसेच संविधानाने प्रत्येक नागरिकाला दिलेल्या धार्मिक स्वातंत्र्याचा आणि आपल्या धर्माचा प्रचार–प्रसार करण्याच्या अधिकाराचा सन्मान राखला जावा, अशी भूमिका शिष्टमंडळाने मांडली.

जातीय वर्गीकरणाच्या नावाखाली बौद्ध आणि मातंग समाजामध्ये जाणीवपूर्वक तेढ निर्माण केली जात असल्याचा आरोपही निवेदनातून करण्यात आला. विविध समाजघटकांमध्ये संघर्ष निर्माण करणाऱ्या वक्तव्यांना आणि कृतींना आळा घालण्यासाठी प्रशासनाने ठोस पावले उचलावीत, अशी मागणी करण्यात आली.

प्रशासनाने कोणताही भेदभाव न करता कायद्याची समान अंमलबजावणी करावी, अशी मागणी यावेळी शिष्टमंडळाने केली. अल्पसंख्याक आयोगाच्या अध्यक्षांकडे निवेदन देताना जिल्ह्यातील विविध समाजघटकांच्या प्रश्नांवर तातडीने लक्ष घालून संबंधित विभागांना आवश्यक निर्देश देवून तक्रारींचा सखोल आढावा घेण्याची अपेक्षाही व्यक्त केली.

## मॉडर्न हायस्कूलच्या विद्यार्थी प्रतिनिधीपदी पुरुषोत्तम मलगुंडे, रिद्धी वैद्य विजयी

**● अकोले । वीरभूमी–**

हिंद सेवा मंडळ संचलित अकोले येथील मॉडर्न हायस्कूलच्या विद्यार्थी प्रतिनिधी (जी.एस.) पदाच्या निवडणुकीत पुरुषोत्तम प्रशांत मलगुंडे, तर विद्यार्थिनी प्रतिनिधी (एल. आर.) पदावर रिद्धी सचिन वैद्य विजयी झाली. या निवडणुकीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष मतदानाचा अनुभव घेत लोकशाहीचे धडे गिरविले.



विद्यार्थी प्रतिनिधी व विद्यार्थिनी प्रतिनिधी पदासाठीची निवडणूक प्रक्रिया नुकतीच उत्साही वातावरणात पार पडली. उमेदवारी अर्ज दाखल करणे, माघार, चिन्ह वाटप, प्रचारसभा यांसह विविध प्रक्रिया विद्यार्थ्यांनीच पार पाडल्या. उत्साहपूर्ण वातावरणात मतदान झाले. संपूर्ण मतदान प्रक्रिया निष्पक्षपणे पार पडली. निकाल जाहीर होताच विद्यार्थ्यांनी टाळ्यांचा कडकडाट व घोषणाबाजी करत विजयी उमेदवारांचे अभिनंदन केले.

मुख्य निवडणूक आयुक्त म्हणून पर्यवेक्षक दिलीप झोळेकर यांनी, तर सहाय्यक निवडणूक आयुक्त म्हणून गणेश जोशी यांनी जबाबदारी सांभाळली. कलाशिक्षक मीनानाथ खराटे यांनी आकर्षक फलकलेखन तसेच निवडणुकीचे साहित्य तयार केले.

यावेळी अकोले तहसील कार्यालयातील संजय गांधी निराधार योजनेचे नायब तहसीलदार सचिन बांबळे, साकीरवाडीचे मंडलाधिकारी जयवंत भांगरे, प्रशासकीय अधिकारी संतोष कचरे, हिंद सेवा मंडळाचे कार्यकारिणी सदस्य दिलीप शहा, माजी विद्यार्थी प्रतिनिधी तथा ज्ञानवर्धिनी बालक मंदिर विभागाचे चेअरमन अमोल वैद्य उपस्थित होते.

निवडणूक प्रक्रिया यशस्वीपणे पार पाडण्यासाठी पोपट उकिरडे, रामदास वैद्य, दत्तात्रय फापाळे, सचिन घुले, सुजाता देशमुख, मोनिका पारधी, सोनाली गोडगे, अनिता निसळ, शितल धुमाळ, सौ. वाकचौरे यांच्यासह शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. निवडणुकीचे बहुतांश काम इयत्ता नववी ‘अ’च्या विद्यार्थ्यांनी यशस्वीपणे पार पाडले, तर एनसीसीच्या विद्यार्थ्यांनी संपूर्ण यंत्रणेवर नियंत्रण ठेवले.

नूतन विद्यार्थी प्रतिनिधी पुरुषोत्तम मलगुंडे व विद्यार्थिनी प्रतिनिधी रिद्धी वैद्य यांचे हिंद सेवा मंडळाचे कार्यकारिणी सदस्य दिलीप शहा, सहायक सचिव योगेश देशमुख, प्रशासकीय अधिकारी संतोष कचरे, विद्यालयाच्या चेअरमन प्रतिमा कुलकर्णी, ज्युनियर कॉलेजचे चेअरमन बाळासाहेब वडजे, ज्ञानवर्धिनी प्राथमिक शाळेच्या चेअरमन स्मिता मुंदडा, बालक मंदिरचे चेअरमन अमोल वैद्य, मॉडर्न हायस्कूलच्या प्राचार्या जयश्री नन्नवरे, उपमुख्याध्यापक सुधीर जोशी, ज्युनियर कॉलेज विभागाचे उपप्राचार्य दीपक जोंधळे, पर्यवेक्षक दिलीप झोळेकर, ज्ञानवर्धिनीचे मुख्याध्यापक रावसाहेब नवले यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

## ध्वनीप्रदूषण टाळण्यासाठी त्रिमूर्ती व्हिजन सोसायटीचा गणेशोत्सव ‘डीजे मुक्त’

**पारंपारीक पद्धतीने मिरवणूक । पर्यावरणपूरक गणेशमूर्तीचा निर्णय**

**● शिरूर । वीरभूमी –**

शिरूर शहरातील नामांकित व मोठी गृहनिर्माण सोसायटी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या त्रिमूर्ती व्हिजन सोसायटीच्या गणेशोत्सव मंडळाची सभा नुकतीच पार पडली. या सभेत गणेश आगमन व विसर्जन मिरवणुकीत डीजेचा वापर न करण्याचा तसेच पर्यावरणपूरक गणेशमूर्तीची प्रतिष्ठापना करून गणेशोत्सव साजरा करण्याचा एकमुखी निर्णय घेण्यात आला.

त्रिमूर्ती व्हिजन सोसायटीमध्ये विविध क्षेत्रांत कार्यरत अधिकारी व पदाधिकारी वास्तव्यास असून, वर्षभर विविध सांस्कृतिक व सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून परंपरांचे जतन केले जाते. महिला व मुलांसाठी विविध कार्यक्रमांसह आरोग्यविषयक उपक्रमही राबविले जातात.

यंदाच्या गणेशोत्सवाच्या नियोजनासाठी झालेल्या सभेत ध्वनीप्रदूषण टाळण्यासाठी आगमन व विसर्जन मिरवणुकीत डीजेचा वापर न करण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच पर्यावरणाचे रक्षण लक्षात घेऊन पर्यावरणपूरक श्रीगणेशमूर्ती आणण्याचे ठरले. त्यामुळे यंदाचा त्रिमूर्ती व्हिजन सोसायटीचा गणेशोत्सव डीजेमुक्त आणि पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा होणार आहे.

शिरूर शहरातील विविध पदाधिकारी व अधिकारी सोसायटीतील गणेशोत्सवाच्या कार्यक्रमांना भेट देत असल्याने सोसायटीने घेतलेला हा निर्णय शहरातील इतर गणेशोत्सव मंडळांसाठीही प्रेरणादायी ठरणार असल्याचे मत व्यक्त होत आहे. या निर्णयाचे शिरूर शहरातून कौतुक होत आहे.

सोसायटीचे अध्यक्ष तथा गणेशोत्सव मंडळाचे अध्यक्ष आशिष शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेस सोसायटीचे माजी अध्यक्ष तथा संस्थापक कारभारी बाबर, उपाध्यक्ष दिनेश कळमकर, खजिनदार संदीप येवले, सचिव संजय बनकर, अंबरनाथ शिंदे, निलेश घोडके, नवनाथ निचित, अनिल जाधव, दत्तात्रय नरवडे, कैलास कोठावळे, राजूशेठ नवले, आबा सोनुळे, परेश काळे, गोरक्षनाथ कुटे, विजय देविकर, विकास शिंदे, दत्तात्रय येडवे, संभाजी फटांगरे, संतोष यादव, प्रशांत कुसुंदल, जयसिंग मापारी, सुनील येल्लोळ, सुनील वाघ, विश्वास जगताप, संतोष चोभे, नितीन पवार, दिलीप देशमुख, विलास फंड, विजय रसाळ, प्रदीप पोटघन, संतोष येवले, विपुल राऊत, मयूर मोटे, बाबाजी मावळे तसेच महिला प्रतिनिधी जयश्री खोसे, अलका बोरुडे, सुवर्णा फटांगरे, पूजा येवले, सुनिता यादव यांच्यासह पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पेमगिरीच्या शहागड किल्ल्याला चिमुकल्यांची भेट

**जाणून घेतला शिवरायांचा इतिहास । मांडेवाडी, चांदसूरज व शिदवड शाळांचा संयुक्त उपक्रम**

**● अकोले । वीरभूमी–**

इतिहास हा केवळ पुस्तकातून वाचण्याचा विषय नसून ऐतिहासिक स्थळांना प्रत्यक्ष भेट देऊन अनुभवण्याचा विषय आहे, या उद्देशाने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मांडेवाडी, चांदसूरज व शिदवड यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांची पेमगिरी येथील ऐतिहासिक शहागड किल्ला व परिसराची शैक्षणिक भेट आयोजित करण्यात आली.



या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी शहागड किल्ल्याची रचना, भौगोलिक स्थान, परिसरातील ऐतिहासिक अवशेष आणि किल्ल्याचे ऐतिहासिक महत्त्व जाणून घेतले. छत्रपती शिवाजी महाराजांची स्वराज्यनिर्मिती, गड–किल्ल्यांचे महत्त्व, गनिमी काव्याची रणनीती तसेच स्वराज्यासाठी मावळ्यांनी दिलेले योगदान याबाबत शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

बाळेश्वर पर्वतरांगेतील पेमगिरीचा निसर्गरम्य परिसर, डोंगररांगा आणि ऐतिहासिक वारसा यामुळे विद्यार्थ्यांना इतिहासासोबतच भूगोलाचाही प्रत्यक्ष अनुभव घेता आला. किल्ला व परिसरातील विविध ऐतिहासिक ठिकाणांचे विद्यार्थ्यांनी निरीक्षण केले. गड–किल्ले हे आपल्या इतिहासाचे जिवंत साक्षीदार असून त्यांचे जतन करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे, असा संदेश यावेळी विद्यार्थ्यांना देण्यात आला.

पुस्तकी अभ्यासाला प्रत्यक्ष अनुभवाची जोड मिळाल्याने विद्यार्थ्यांमध्ये इतिहासाविषयी कुतूहल निर्माण झाले. शिवरायांचे शौर्य, दूरदृष्टी, स्वराज्यनिष्ठा आणि नेतृत्वगुण विद्यार्थ्यांना अधिक प्रभावीपणे समजले. ऐतिहासिक वारसा जपण्याची भावना विद्यार्थ्यांच्या मनात रुजविण्यासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरला.

या शैक्षणिक भेटीत मुख्याध्यापिका सविता वाकचौरे, सोनाली चौधरी, ज्ञानदेव फापाळे, नारायण चौधरी, जयवंत भांगरे, भाऊसाहेब कासार, अनिता ढगे, पुष्पा लोहकरे आदी शिक्षक सहभागी झाले होते.

### ‘इतिहास अनुभवला तर तो कायम स्मरणात राहतो’

■ इतिहास पुस्तकात वाचण्यापेक्षा गड–किल्ल्यांच्या सान्निध्यात प्रत्यक्ष अनुभवला, तर तो विद्यार्थ्यांच्या मनावर कायमचा कोरला जातो. या विचारातून विद्यार्थ्यांना शहागड किल्ला व पेमगिरी परिसराची भेट घडवून आणली. या माध्यमातून विद्यार्थ्यांना छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास, गड–किल्ल्यांचे महत्त्व आणि ऐतिहासिक वारसा जपण्याची प्रेरणा मिळाली. परिसर भेट हा मुलांच्या शिकण्याचा अविभाज्य भाग बनला पाहिजे.

**– नारायण चौधरी,**
उपक्रमशील शिक्षक,
शिदवड

# डॉ. सुजय विखे पाटलांकडून भुईकोट किल्ल्याची पाहणी

## मंजूर कामांच्या आराखड्याची अधिकाऱ्यांकडून घेतली माहिती



**अहिल्यानगर । वीरभूमी–** शहरालगतच्या ऐतिहासिक भुईकोट किल्ल्याच्या संवर्धन आणि पर्यटन विकासासाठी मंजूर झालेल्या कामांच्या पार्श्वभूमीवर भाजप प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांनी किल्ल्याची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी संबंधित अधिकारी व ठेकेदारांकडून मंजूर कामांच्या आराखड्याची सविस्तर माहिती घेत त्यांनी प्रत्यक्ष जागेवर कोणत्या भागात कोणती कामे होणार आहेत, याचा आढावा घेतला.

डॉ. विखे पाटील यांनी अधिकाऱ्यांसमवेत किल्ल्याच्या विविध भागांची पाहणी केली. प्रस्तावित कामांची रचना, ऐतिहासिक वास्तूंचे जतन, परिसराचे नियोजन आणि पर्यटकांसाठी प्रस्तावित सुविधांबाबत त्यांनी संबंधितांकडून माहिती जाणून घेतली. आराखड्यातील कामांची प्रत्यक्ष जागेशी सांगड घालत आवश्यक त्या सुधारणा व बदलांबाबत त्यांनी अधिकाऱ्यांना सूचना केल्या.

ऐतिहासिक वारशाचे मूळ स्वरूप व महत्त्व अबाधित ठेवूनच विकासकामांचे नियोजन करण्यात यावे, यावर डॉ. विखे पाटील यांनी विशेष भर दिला.

भुईकोट किल्ल्याच्या नूतनीकरणासाठी निधी मंजूर झाल्यानंतर लष्करी प्रशासनासोबत सामंजस्य करार (चजण) होणे हा महत्त्वाचा टप्पा होता. हा करार पूर्ण होण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील तसेच आमदार संग्राम जगताप यांच्या पातळीवर झालेल्या प्रयत्न व पाठपुराव्यामुळे चजण पूर्ण झाला. त्यानंतर मंजूर आराखड्यानुसार पुढील प्रक्रिया सुरू झाली आहे.

किल्ल्याशी संबंधित ऐतिहासिक वास्तू, स्वातंत्र्यलढ्याच्या स्मृती आणि विविध महत्त्वपूर्ण ऐतिहासिक संदर्भांचे जतन करून ते नव्या पिढीसमोर प्रभावीपणे मांडण्याचे नियोजन करण्यात आले आहे. 'डिस्कव्हरी ऑफ इंडिया'सह सरदार वल्लभभाई पटेल आणि पंडित जवाहरलाल नेहरू यांच्याशी संबंधित ऐतिहासिक संदर्भांनाही या माध्यमातून उजाळा मिळणार आहे.

भुईकोट किल्ला हा अहिल्यानगरच्या इतिहासाचा आणि अस्मितेचा महत्त्वपूर्ण ठेवा आहे. या ऐतिहासिक वारशाचे संवर्धन करत किल्ल्याला पर्यटनाच्या दृष्टीने नवी ओळख मिळवून देण्यासाठी मंजूर आराखड्याची प्रत्यक्ष पाहणी करून डॉ. विखे पाटील यांनी कामाच्या नियोजनाचा आढावा घेतला. यावेळी संबंधित अधिकारी, ठेकेदार आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

# निधी वाटपात पक्षपात; शिवसेना नगरसेवकांचा एल्गार!

**श्रीगोंदा नगरपालिकेतील कारभारावर गंभीर आरोप । ११ सप्टेंबरपासून उपोषणाचा इशारा**

**श्रीगोंदा । वीरभूमी–** विकासकामांचा निधी हा जनतेच्या विकासासाठी असतो, सत्ताधाऱ्यांच्या मर्जीप्रमाणे वाटण्यासाठी नव्हे! असा घणाघात करत श्रीगोंदा नगरपरिषदेत विकासकामांच्या निधी वाटपात सत्ताधारी व प्रशासनाकडून पक्षपातीपणा केला जात असल्याचा गंभीर आरोप शिवसेना नगरसेवकांनी केला आहे. या कथित अन्यायाविरोधात शिवसेनेचे गटनेते श्रीकृष्ण उर्फ बाबूशेठ बबन धुमाळ यांच्यासह नऊ नगरसेवकांनी थेट आंदोलनाचा इशारा दिला असून, मागण्यांची तातडीने दखल न घेतल्यास ११ सप्टेंबर २०२६ पासून नगरपरिषद कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा निर्धार केला आहे.



याबाबतचे निवेदन राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, नगरपरिषदेचे मुख्याधिकारी तसेच तहसीलदार यांना देण्यात आले आहे. सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान, नागरी दलितेतर निधी तसेच जिल्हा नियोजन समितीच्या निधीचे वाटप करताना शिवसेना नगरसेवकांना समान आणि सन्मानजनक निधी दिला जात नसल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. महायुतीतील घटक पक्षाच्या नगरसेवकांनाच विकासनिधीच्या वाटपात डावलले जात असेल, तर महायुती धर्माची अंमलबजावणी नेमकी कुठे होत आहे? असा सवालही नगरसेवकांनी उपस्थित केला आहे.

नगरपरिषद कार्यालयात शिवसेना नगरसेवकांसाठी स्वतंत्र दालन उपलब्ध करून देण्यात यावे, अशी मागणीही करण्यात आली आहे. तसेच कोणत्याही प्रभागात विकासकामे मंजूर करताना त्या प्रभागातील संबंधित नगरसेवकांची शिफारस व मंजुरी बंधनकारक करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

निधी आणि विकासकामांचे वाटप पक्षीय आकसातून न करता सर्व नगरसेवकांना समान न्यायाच्या तत्त्वावर करण्यात यावे, अशी भूमिका शिवसेना नगरसेवकांनी घेतली आहे. पालकमंत्र्यांनी या प्रकरणात तातडीने हस्तक्षेप करून कथित पक्षपाती कारभाराला आळा घालावा आणि दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

या मागण्यांवर तातडीने निर्णय न झाल्यास ११ सप्टेंबरपासून आमरण उपोषण करण्याचा इशारा देण्यात आल्याने श्रीगोंदा नगरपरिषदेतील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे.

# प्रति लालबागच्या राजाचे कोपरगावात जल्लोषात आगमन

**मूर्तिकार संतोष कांबळी यांनी साकारलेल्या बाप्पाच्या मूर्तीचे ढोल-ताशांच्या गजरात उत्स्फूर्त स्वागत**

**कोपरगाव । वीरभूमी–** संघर्ष फाऊंडेशन ट्रस्ट सार्वजनिक गणेशोत्सव समिती, कोपरगावच्या वतीने यंदा १४ व्या वर्षी भव्य गणेशोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. उत्सवाचे खास आकर्षण असलेल्या मुंबईच्या प्रसिद्ध लालबागच्या राजाचे मूर्तिकार संतोष रत्नाकर कांबळी यांच्या हस्ते साकारलेल्या प्रति लालबागच्या राजाच्या गणेशमूर्तीचे कोपरगावकरांनी जल्लोषात स्वागत केले.

मूर्तीच्या आगमनानिमित्त श्री स्वामी समर्थ मंदिर, मेन रोड येथून मिरवणुकीला सुरुवात झाली. छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, अण्णा भाऊ साठे पुतळा मार्गे येवला रोडवरील उत्सवस्थळी ही भव्य मिरवणूक पोहोचली. भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून बाप्पाचे उत्स्फूर्त स्वागत केले.

आगमन सोहळ्याचे प्रमुख आकर्षण ठरलेल्या मुंबईच्या प्रसिद्ध चेंबूर बिट्स बँडसह जय तुळजा भवानी तरुण मंडळाच्या ढोल-ताशा पथकाने सादर केलेल्या वादनाने परिसर दुमदुमून गेला. ढोल-ताशांच्या गजरात आणि बँडच्या तालावर बाप्पाचे आगमन अविस्मरणीय ठरले. गणेशोत्सवाचे हे १४ वे वर्ष असल्याने मंडळाने यंदाचा उत्सव अधिक भव्य करण्यासाठी विशेष नियोजन केले आहे.



बाप्पाच्या आगमन सोहळ्यानंतर संत जनार्दन स्वामी आश्रमाचे मठाधिपती रमेशगिरी महाराज, आत्मा मलिक ध्यानपीठाचे परमानंद महाराज आणि राघवेश्वरानंदगिरी महाराज यांच्या हस्ते आरती करण्यात आली.

यावेळी मंडळाचे अध्यक्ष अभिजित सरोदे, तुषार सरोदे, रोहित पटेल, नितीन वानखेडे, गुर्मीत दडियाल, राहुल देवरे, निखिल सांगळे, कार्तिक सरदार, वासुदेव शिंदे, राजू पटेल, नीरज डंबीर, अर्जुन माकोने, संकेत निकम, हाफिज शेख, गोटू खिल्लारी, अभिषेक जाधव, ओम बागुल, मयूर गायकवाड, वैभव सोळसे, योगेश पटेल, दिनेश शिंदे, सिद्धार्थ शेलार, विकास वाळुंज, वेदांत पटेल, भल्लू ठक्कर, भूषण सोनवणे, रितेश राऊत यांच्यासह मंडळाचे पदाधिकारी, सदस्य आणि मोठ्या संख्येने कोपरगावकर नागरिक उपस्थित होते.

> गेली १३ वर्षे कोपरगावकरांनी आमच्यावर भरभरून प्रेम केले आहे. हे १४ वे वर्ष अविस्मरणीय व्हावे, यासाठी यंदा थेट लालबागच्या राजाचे प्रसिद्ध मूर्तिकार संतोष कांबळी यांच्याकडून गणेशमूर्ती घडवून आणली आहे. कोपरगावकरांना मुंबईच्या लालबागच्या राजाची अनुभूती आपल्या शहरातच मिळावी, हा आमचा प्रयत्न आहे. भव्य आगमन सोहळ्यात मोठ्या संख्येने सहभागी होऊन बाप्पाचे स्वागत केल्याबद्दल सर्व गणेशभक्तांचे मनःपूर्वक आभार.
>
> **– अभिजित सरोदे,**
> अध्यक्ष, संघर्ष फाऊंडेशन ट्रस्ट, कोपरगाव

# विद्यार्थ्यांनी लहानपणापासून दातांची काळजी घ्यावी

## डॉ. अंकित कृष्णानी । वारीत ३८० विद्यार्थ्यांची दंत तपासणी

**कोपरगाव । वीरभूमी– वृद्धापकाळात दातांच्या समस्यांमुळे होणारा त्रास टाळायचा असेल, तर लहानपणापासूनच दातांची योग्य काळजी घेणे गरजेचे आहे. दात अन्न चावण्यासाठीच नव्हे, तर स्पष्ट बोलणे, चेहऱ्याचे सौंदर्य आणि प्रसन्न हास्यासाठीही महत्त्वाचे आहेत, असे मार्गदर्शन इंडियन डेंटल असोसिएशनचे डॉ. अंकित कृष्णानी यांनी वारी येथील विद्यार्थ्यांना केले.**



कोपरगाव तालुक्यातील वारी येथे टेके पाटील चॅरिटेबल ट्रस्ट संचलित 'मोफत मदत सेवा केंद्रा'च्या चतुर्थ वर्धापन दिनानिमित्त श्री रामेश्वर विद्यालय व जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत 'मोफत दंत तपासणी व मौखिक आरोग्य' या विषयावर विशेष मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी जिल्हा परिषद सदस्य दिवाकर निळे होते.

यावेळी डॉ. कृष्णानी यांनी विद्यार्थ्यांना दात किडण्याची कारणे, दंत स्वच्छतेचे महत्त्व आणि दातांची योग्य निगा कशी राखावी, याबाबत प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले. दातांमध्ये 'कीडा' नसतो, तर अन्न दातांमध्ये अडकून राहिल्यानंतर त्यातून तयार होणारे सिड दातांचे नुकसान करते, असा गैरसमजही त्यांनी दूर केला.

दात घासण्यासाठी कडक ब्रशऐवजी मऊ (सॉफ्ट) ब्रश वापरावा. ब्रश पुढे-मागे जोरात न घासता हिरड्यांकडून दातांच्या दिशेने हळुवार फिरवावा. दातांची बाहेरील व आतील बाजू, चावण्याचा पृष्ठभाग तसेच जीभ व्यवस्थित स्वच्छ ठेवावी, असा सल्ला डॉ. कृष्णानी यांनी दिला.

शिबिराच्या पहिल्या टप्प्यात श्री रामेश्वर विद्यालयातील १८० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांची दंत तपासणी करण्यात आली. दोन्ही शाळांमधील ३८० पेक्षा अधिक विद्यार्थी या उपक्रमास उपस्थित होते. डॉ. अंकित कृष्णानी, डॉ. अस्मिता लाडे, डॉ. श्रद्धा तिरमखे व डॉ. मानसी गंगवाल यांनी विद्यार्थ्यांची दंत तपासणी केली.

यावेळी टेके पाटील ट्रस्टचे अध्यक्ष तथा पत्रकार रोहित टेके, डॉ. अंकित कृष्णानी, डॉ. अस्मिता लाडे, डॉ. श्रद्धा तिरमखे, डॉ. मानसी गंगवाल, माजी सरपंच बाबासाहेब शिंदे, भारतीय जैन संघटनेचे नरेंद्र ललवानी, माजी ग्रामपंचायत सदस्य गोरख टेके, सामाजिक कार्यकर्ते दिनेश निकम, मोनिका गुंजाळ, माजी उपसरपंच रामदास सोनवणे, मुख्याध्यापक शरीफ शेख, मुख्याध्यापक चंद्रकांत माळी, उत्तमराव वाकचौरे, पोपट समिंदरे व राजेंद्र बाराहाते उपस्थित होते.

# शेवगावातील शेअर बाजार फसवणूक प्रकरणातील आरोपी साईनाथ कवडेला सर्वोच्च न्यायालयाचा दणका

**जिल्हा न्यायालय, उच्च न्यायालयानंतर सर्वोच्च न्यायालयानेही नियमित जामिन फेटाळला**

**शेवगाव । वीरभूमी–** शेवगाव तालुक्यात गाजत असलेल्या शेअर बाजार गुंतवणूक फसवणूक प्रकरणातील आरोपी साईनाथ कल्याण कवडे याचा नियमित जामिनासंदर्भातील विशेष अनुमती अर्ज सर्वोच्च न्यायालयाने फेटाळला. त्यामुळे आरोपीला मोठा धक्का बसला आहे.

शेवगाव येथील रहिवासी व या प्रकरणातील मूळ फिर्यादी अवधूत विनायक केदार यांनी आरोपी साईनाथ कवडे याच्याविरुद्ध शेवगाव पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. फिर्यादीसह अन्य गुंतवणूकदारांची मिळून तब्बल १ कोटी ६१ लाख ४२ हजार ९०० रुपयांची आर्थिक फसवणूक झाल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

फिर्यादीच्या आरोपानुसार, आरोपी साईनाथ कवडे याने 'सिटिक सोल्युशन्स' या शेअर बाजार ट्रेडिंग कंपनीच्या माध्यमातून गुंतवणुकीवर १२ टक्के परतावा देण्याचे आश्वासन देत फिर्यादी व अन्य गुंतवणूकदारांचा विश्वास संपादन केला. त्यानंतर अनेक गुंतवणूकदारांनी आरोपीकडे मोठ्या प्रमाणावर आर्थिक गुंतवणूक केली. मात्र, आश्वासनानुसार परतावा न देता तसेच गुंतवणूकदारांची मूळ रक्कमही परत न केल्याने आर्थिक फसवणूक झाल्याची तक्रार करण्यात आली.

या प्रकरणी २८ ऑक्टोबर २०२४ रोजी शेवगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपीविरुद्ध भारतीय दंड संहितेतील संबंधित कलमांसह लागू कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणात यापूर्वी जिल्हा व सत्र न्यायालय, अहिल्यानगर येथे आरोपीचा नियमित जामीन अर्ज फेटाळण्यात आला होता. त्यानंतर आरोपीने उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात जामिनासाठी अर्ज केला; मात्र तेथेही त्याला दिलासा मिळाला नाही. उच्च न्यायालयाच्या आदेशाला आव्हान देत आरोपीने सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका दाखल केली होती.

या याचिकेची सुनावणी सर्वोच्च न्यायालयातील न्यायमूर्ती संजय कुमार व न्यायमूर्ती संजीव सचदेवा यांच्या खंडपीठासमोर झाली. मूळ फिर्यादी अवधूत विनायक केदार व अन्य गुंतवणूकदारांच्या वतीने ॲड. संदीप देशमुख व ॲड. प्रशांत गिरी यांनी आरोपीच्या जामिनास तीव्र विरोध केला.

प्रकरणातील युक्तिवाद, उच्च न्यायालयाचा आदेश तसेच दाखल कागदपत्रांचे अवलोकन केल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने उच्च न्यायालयाच्या आदेशात हस्तक्षेप करण्यासाठी या टप्प्यावर कोणतेही ठोस कारण किंवा आधार आढळत नसल्याचे नमूद करत विशेष अनुमती याचिका फेटाळली. याचिकेशी संबंधित अन्य प्रलंबित अर्ज असल्यास तेही निकाली काढण्यात आल्याचे आदेशात नमूद करण्यात आले.

मूळ फिर्यादी अवधूत विनायक केदार व अन्य यांच्यावतीने ॲड. संदीप देशमुख यांनी बाजू मांडली. त्यांना ॲड. प्रशांत गिरी, ॲड. योगेश कासोद व ॲड. पवन जोंधळे यांनी सहकार्य केले.

जिल्हा व सत्र न्यायालय, त्यानंतर उच्च न्यायालय आणि आता सर्वोच्च न्यायालयातूनही आरोपीला जामिनाबाबत दिलासा न मिळाल्याने या बहुचर्चित प्रकरणाला महत्त्वपूर्ण वळण मिळाले आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे फिर्यादी अवधूत केदार व अन्य गुंतवणूकदारांमध्ये समाधानाची भावना व्यक्त होत असून, प्रकरणातील पुढील न्यायालयीन प्रक्रियेकडे शेवगाव तालुक्यासह संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.